**कि.फौ. ख.क्र. ४२३/२०१७** **नि.३० खाली**

**साक्षिदार क्र.१ याचा पुढील सरतपास गैरअर्जदारातर्फे वकील पुडके यांच्याकडून.**

१३. माझ्या प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर मी वाचून पाहिला आहे. तो माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर लिहीलेला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र.३० देण्यात येत आहे.

१४. आता मला यादी नि.क्र.३२ सोबत अनु.क्र.०१ वर दाखल माझ्या वार्षीक उत्पन्नाचा दाखला तहसीलदार यांनी दिनांक ०९.१२.२०२४ रोजी निर्गमीत केलेला दाखविला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२ सोबत अनु.क्र.०२ वर दाखल माझ्या वार्षीक उत्पन्नाचा दाखला तहसीलदार यांनी दिनांक ०६.१२.२०१८ रोजी निर्गमीत केलेला दाखविला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२ सोबत अनु.क्र.०३ वर दाखल हिंदु विवाह अर्ज क्र.५४/२०१२ मधील न्यायनिर्णयाची प्रमाणीत प्रत दाखविली. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२ सोबत अनु.क्र.०४ वर दाखल हिंदु विवाह अर्ज क्र.५४/२०१२ मधील हुकुमन्याम्याची प्रमाणीत प्रत दाखविली. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येते. आता मला यादी नि.क्र.३२ सोबत अनु.क्र.०५ वर दाखल अर्जदाराने मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलावरील निर्णयाची ऑनलाईन प्रत, ज्यावर डिजीटल स्वाक्षरी केलेली आहे, दाखविली. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.08.30 15:03:20 +0530

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)

दिनांक –१७/०७/२०२५ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२, कामठी.

**गैरअर्जदारातर्फे साक्षिदार क्र.१ चा उलटतपास अर्जदारार्फे वकील श्री. व्ही. पी. भोयर यांच्याकडून शपथेवर सुरु**

१५. हे म्हणणे खरे आहे की अर्जदारासोबत माझे लग्न दि.२१.०६.२००७ रोजी झाले होते व त्या लग्नापासून आम्हाला एक मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की मी सुरुवातीपासून म्हणजेच मुलाच्या जन्मापासून अर्जदाराच्या चारित्र्यावर संशय घेत होतो. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराच्या प्रसुतीचा खर्च अर्जदाराच्या आईने केला. साक्षीदार स्वतःहून सांगतो की त्याने अर्जदाराकडे रु.४,०००/– ते ५,०००/– दिले होते. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला रु.४,०००/– ते ५,०००/– दिल्याबाबत खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार माझ्याकडे राहत असताना मी तिला तिच्या माहेरुन रु.५,००,०००/– आणण्यास सांगत होतो. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला मारहाण करीत होतो व मला वाटेल तेव्हा तिला तिच्या माहेरी सोडायचो. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराला तिच्या माहेरी कधीही आणायला गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की मी अर्जदाराचे जावई संतोष गुप्ता यांना बघून, मी तुमची अमानत परत आणली आहे असे म्हणायचो. हे म्हणणे खरे नाही की माझ्या नातेवाईकांमध्ये लग्न असल्यास मी अर्जदाराला तिच्या माहेरुन आणायचो व लग्न झाल्यानंतर परत नेउन दयायचो. हे म्हणणे खरे नाही की दि.०१.०४.२०११ रोजी रु. ५ लाख आणण्याच्या कारणावरुन आमच्यात वाद झाला व मी अर्जदाराला मारहाण केली व तिला माहेरी सोडून दिले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की अर्जदार घरातील वातावरण खराब करत असल्याने मी तिला माहेरी सोडून दिले होते.

१६. हे म्हणणे खरे नाही की मला अर्जदारापासून घटस्फोट घ्यायचा आहे. हे म्हणणे खरे आहे की मी भंडारा येथील न्यायालयात अर्जदाराला नांदविण्याची केस टाकली होती. हे म्हणणे खरे नाही की त्या केस मध्ये मी घटस्फोटाचीसुध्दा मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की अर्जदार त्या केस मध्ये हजर झाली होती व तिने तिचे म्हणणेसुध्दा दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या केसमध्ये अर्जदाराने खावटी मिळण्यासाठी अर्ज केला होता व तो अर्ज न्यायालयाने फेटाळला होता. हे म्हणणे खरे नाही की अर्जदाराचा उपरोक्त अर्ज खारीज केल्यानंतर ती त्या केसमध्ये हजर झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की त्या केसमध्ये अर्जदाराचा पुरावा झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की उपरोक्त प्रकरण एकतर्फा चालले होते. हे म्हणणे खरे आहे की त्या प्रकरणात अर्जदाराने माझ्यासोबत नांदायला जावे असा आदेश झाला होता. हे म्हणणे खरे नाही की त्या आदेशाची पुर्तता करण्याकरीता अर्जदार दि.०५.०५.२०१७ रोजी माझ्याकडे आली होती. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार त्यानंतर माझ्यासोबत एक ते दिड महिना नांदली. हे म्हणणे खरे नाही की मी दि.२४.०६.२०१७ रोजी अर्जदाराला मारहाण केली व तिच्या माहेरी सोडले. हे म्हणणे खरे आहे की मी उपरोक्त केस मध्ये झालेल्या आदेशावरुन भंडारा न्यायालयात अपील केले होते. हे म्हणणे खरे आहे की अपीलामध्ये अर्जदार शेवटी हजर झाली होती. हे म्हणणे खरे नाही की अर्जदार त्या अपीलामध्ये प्रत्येक तारखेला येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की अपीलामध्ये मला घटस्फोटाचा आदेश मिळाला.

१७. मी भांडयाच्या दुकानात काम करतो. हे म्हणणे खरे आहे की माझ्या वडीलांचे भांडयाचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या स्वतःच्या भांडयाच्या दुकानात काम करतो. साक्षीदार

स्वतःहून सांगतो की तो दुस–याच्या दुकानात काम करतो. हे म्हणणे खरे  नाही की मी सदर कामातून रु.५०,०००/– प्रति महा कमवितो. हे म्हणणे खरे नाही की मी माझ्या पत्नीला दर महा रु. १०,०००/– व मुलाला दर महा रु.७,०००/– देउ शकतो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की त्याला दर महा रु.६,०००/– पगार मिळतो. हे म्हणणे खरे नाही की मला दर महा रु.६,०००/– पगार मिळत असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ३३ व ३४ वर दाखल माझे उत्पन्नाचे प्रमाणपत्र खोटे आहे. मी ज्यांनी मला उत्पन्नाचे प्रमाणपत्र निर्गमित केले त्यांना तपासणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी माझे उत्पन्न लपवित आहे. हे म्हणणे खरे  नाही की मला अर्जदाराला खावटी देणे लागू नये म्हणून मी खोटे कागदपत्र तयार केले. हे म्हणणे खरे  नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

ठिकाण –कामठी (राजेश र. शेरेकर)
दिनांक –२९/०८/२०२५ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.२, कामठी.